मुद्रा यशोगाथा

नाव :- श्रीमती शारदा संजय जाधव, खरवली गाव, ता.महाड, जि.रायगड

व्यवसाय :- द्रोण व पत्रावळी बनविण्याचा व्यवसाय

# शारदेला मुद्राचा आधार, झाला सुखी संसार



१. महाड तालुक्यातील खरवली गावातील शारदा संजय जाधव गेली अनेक वर्षे भांडी विक्रीचा व्यवसाय करत आहेत. त्यांचे पतीचे सहकार्याने त्यांनी प्रथम शिलाई मशीन घेऊन कपडे शिलाई व्यवसाय सुरु केला. मात्र या व्यवसायात जम न बसल्याने त्यांनी मुद्रा बँक योजनेतून स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या महाड शाखेतून कर्ज प्रकरण केले. २ लाख ६३ हजार रुपये कर्ज घेऊन त्यांनी द्रोण बनविण्याची मशिन घेतली.

२. नवीन व्यवसाय मोठ्या जिद्दने सुरु करुन प्रतिदिन ८० बंडल तयार केले जातात. २० रुपये शेकडा प्रमाणे त्यांनी विक्री सुरु केली. तसेच होलसेल व्यापारींकडेही विक्री केली जाते.या लागणारा सिल्वर कागद हा कच्चा माल सातारा, पुणे शहरातून आणला जातो.

३. आपल्या व्यवसायामध्ये वृद्धी करण्यासाठी शारदा जाधव यांनी पुन्हा एकदा मुद्रा बँक योजनेतून कर्जासाठी अर्ज सादर केले आहे. तसेच स्टेट बँक आफ इंडियाचे अधिका-यांनी सुध्दा त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा उदयोग केंद्राच्या बीज भांडवल योजनेचा आधार दिला आहे. यातून आता श्रीम. शारदा या पत्रावळी व्यवसाय सुरु करणार आहेत. या कामी त्यांचे पती संजय जाधव यांचे देखील मोलाची साथ लाभत आहे.

४. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यवसाय करणारे व्यासायिक आणि नव तरुणांना व्यावसायिक चालना मिळावी याकरीता मुद्रा कर्ज योजनेचा प्रारंभ केला. देशभरात याला चांगला प्रतिसाद मिळाला याच योजनेतून महाड मधील एक भांडी विक्रेते महिलेनी स्वत:हाचे द्रोण आणि पत्रावली व्यवसाय सुरु केला आहे. त्यामुळे असे म्हणता येईल की, शारदेला मिळाला मुद्रेचा आधार सुखी झाला तिचा संसार.